चंद्रपूर विमानतळाच्या विकास कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यासंदर्भात.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र.मविवि-१२१७/प्र.क्र.२५५/ २८-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि.२६ एप्रिल, २०१८.

**वाचा :**१. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. मविविकं-२०१७/प्र.क्र.३६/भुसं/१६०४, दि.२० मार्च २०१८

२. शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.०४.२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.विचासं-१११८/प्र.क्र.३५/२८-अ, दि.२३ एप्रिल २०१८

**प्रस्तावना :**

चंद्रपूर जिल्ह्यातील मौजे विहीरगाव व मौजे मुर्ती, ता.राजुरा येथील जागेवर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून ग्रीनफील्ड विमानतळ उभारणे प्रस्तावित आहे. यासाठी भारतीय विमानपत्तन प्राधिकरणामार्फत दि.३.०१.२०१८ रोजी Pre-Feasibility सर्व्हे करण्यात आला असून प्रस्तावित जागा प्राथमिकदृष्ट्या विमानतळासाठी योग्य आहे व या जागी दोन टप्प्यांमध्ये विमानतळ उभारणी करावी, असे भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने नमूद केले आहे.

**पहिला टप्पा**- पहिल्या टप्प्यामध्ये विमानतळाची उभारणी Q-४०० व त्यापेक्षा कमी प्रकारच्या विमानांकरिता प्रस्तावित असून त्याकरिता सुमारे २०५० मीटर लांब व ४५ मीटर रुंद इतकी धावपट्टी बांधण्यासाठी सुमारे ७२० एकर जागेची आवश्यकता आहे.

**दुसरा टप्पा** -दुसऱ्या टप्प्यामध्ये A-३२० व त्यापेक्षा कमी प्रकारच्या विमानांकरिता सुमारे ३००० मी. लांब व ४५ मी. रुंद धावपट्टीची आवश्यकता असून यासाठी सुमारे १२० एकर अतिरिक्त जमीन आवश्यक आहे.

२. यानुसार, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने चंद्रपूर जिल्ह्यातील प्रस्तावित विमानतळासाठी सुमारे ८४० एकर जमीन आवश्यक असल्याचे कळवून जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिलेल्या माहितीनुसार खालीलप्रमाणे जागेचा तपशील कळविला आहे.

| टप्पा | शासकीय जमीन (एकर) | | | खाजगी जमीन (एकर) | एकूण जमीन (एकर) |
|---|---|---|---|---|---|
| | सरकारी जमीन | वनजमीन | एकूण | | |
| पहिला | २१५.६८ | ८३.०० | २९८.६८ | ४२१.३२ | ७२०.०० |
| दुसरा | ३३.९२ | -- | ३३.९२ | ८६.०८ | १२०.०० |
| एकूण | २४९.६० | ८३.०० | ३३२.६० | ५०७.४० | **८४०.००** |

३. उपरोक्त नमूद ५०७.४० एकर खाजगी जमिनीपैकी ४६३.७३ एकर जमीन भोगवटादार वर्ग २ तत्त्वावर वाटप केलेली जमीन आहे. या जमिनीच्या संपादनासाठी अंदाजित देय रक्कम रु.४१.०० कोटी आहे. तसेच प्रस्तावित जागेचा OLS (Obstacle Limitation Survey), TEFS (Techno Economic Feasibility Study), Including Site Clearance, In-Principal Approval of Steering Committee consisting of MOCA, MOD, DGCA, etc, MOEF (Ministry of Environment & Forest) clearance, इ. कार्यवाहीसाठी अंदाजित रु.५.०० कोटी निधी असा एकूण रु.४६.०० कोटी निधी मंजूर करण्याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने विनंती केली आहे. तसेच, चंद्रपूर विमानतळाच्या प्रस्तावित जमिनीमधील ३३२.६० एकर शासकीय जमीन विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी, असेही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने प्रस्तावित केले आहे.

४. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या सदर प्रस्तावास मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.०४.२०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून त्याबाबत खालीलप्रमाणे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :**

१) चंद्रपूर येथील प्रस्तावित ग्रीनफील्ड विमानतळाची उभारणी/ विकास करण्यासाठी व अनुषंगिक बाबींसाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस विशेष हेतू संस्था (SPV) म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२) चंद्रपूर विमानतळाच्या प्रस्तावित जमिनीमधील ३३२.६० एकर शासकीय जमीन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३) “भूमीसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई करण्याचा व पारदर्शकतेचा अधिनियम २०१३” या कायद्यानुसार तसेच खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने खरेदी करणेबाबतचा दि.१२.०५.२०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे भूसंपादन करणेसाठी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) चंद्रपूर विमानतळासाठी संपादित करावयाच्या खाजगी जमिनीपैकी ४६३.७३ एकर जमीन संपादनासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी/जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी कळविल्याप्रमाणे रु.४१.०० कोटी व इतर अनुषंगिक खर्चासाठी रु.५.०० कोटी असे एकूण रु.४६.०० कोटी निधी मंजूर करण्यास वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. या बाबतचा होणारा खर्च मागणी क्रमांक एन-७, ३०५३ नागरी विमानचालन, ०२ विमानतळ, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना सहाय्य, राज्य योजना (००) (०२)

विमानतळाच्या विकासाकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सहायक अनुदान (३०५३ ०१६४) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा, व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. याबाबत उपसंचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१८०४२६१४४७५७३८०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sandhya Ashok Bageshwar

Digitally signed by Sandhya Ashok Bageshwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d4a8d57e69da6499480bc974f18dca56ad5541c4795df9434c3e826318ec8ea, serialNumber=ba5a637883d7b445558182d1fd79c7e47a2d65e5094f71fb0ec8c5d23b0cc880, cn=Sandhya Ashok Bageshwar
Date: 2018.04.26 15:48:45 +05'30'

**(सं.अ.बागेश्वर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक
२. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
३. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
४. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अप्पर मुख्य सचिव, मा.मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय,मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव( उद्योग), उद्योग,उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई
९. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१०.प्रधान सचिव, (विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
११.संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई.
१२.महालेखापाल, ( लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई
१४.उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१७.सामान्य प्रशासन विभाग / कार्या.२५, मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती.